FORM-1A

0068619

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

## फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, पहिली खबर क्र. 38, वर्ष 2023 दिनांक 07/12/2023
   State · District · Police Station · FIR No. · Year · Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्रति. अधिनियम – 1988
   (ii) अधिनियम Act आदेवे, कलमे Sections 13(1)(E) सह 13 (2)
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections, कलमे Sections 109.

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून 15/10/2007 वेळ ..., तारीख पर्यंत 05/02/2016 ...
   Occurrence of offence : Day · Date from · Time · Date to · Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ... वेळ ...
   Information received at P. S. · Date · Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 22/2023, तारीख 07/12/2023 वेळ 14:10
   General Diary Reference : Entry No. · Date · Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. · Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आरोपी यांची स्थावर व जंगम मालमत्ता असलेल्या ठिकाणी, ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
   Address of Occurrence Name · No. if any · Ward · Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
   Nearest identifiable place · Village · Post · Taluka · Dist. · State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
   In case, outside the limit of this Police Station · Taluka · Dist. · State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव श्री प्रदिप देवकर (b) वडिलांचे / पतीचे नाव दत्तात्रय देवकर
   Name · Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय 39 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9594971734
   Date of Birth and Age · Nationality · Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ..., दिल्याचा दिनांक ..., दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय नोकरी
   Passport No. · Date of Issue · Place of Issue · Occupation
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता रू.नं. 204, गल्ली / सर्व्हे नं. 2रा मजला, घर / नाव नं. टी-5 इमारत, फोन / मो. नं. नोळ कल्याण पोलिस, पॅन नं. ..., वोटर्स नं. ... अधिकारी वसाहत, कालिना, सांताक्रुझ (पू), मुंबई – 400 098.
   Address : Ward · House/Name No. · Phone/M. No. · PAN No. · Card No.
   रस्त्याचे नाव ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., पो. स्टे. ...
   Road · Nearest identifiable place · Village · Post · P. Stn.
   तालुका ..., जिल्हा ..., राज्य ..., सध्याचा पत्ता ...
   Taluka · Dist. · State · Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   ① पुष्कर ताराचंद मेश्राम, वय 42 वर्षे, दुय्यम अभियंता, मनपा, मुंबई.
   ② सौ. भाग्यश्री पुष्कर मेश्राम, वय 32 वर्षे, दुय्यम अभियंता, मनपा, मुंबई.
   रा. ठि. फ्लॅट नं. 202, B विंग, कुलस्वामिनी दर्शन, कोपरखैरणे, नवी मुंबई.



Scanned with OKEN Scanner

फिर्याद

07/12/2023

श्री. प्रदिप दत्तात्रय देवकर, वय 39 वर्षे, व्यवसाय - नोकरी, (पोलीस निरीक्षक, गट्टप) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - 400 030 यांचा सविस्तर जबाब दि. 07/12/2023 रोजी संगणीकृत करण्यात आला असुन तो सोबत जोडला असुन तोच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि. मुंबई विभाग.

Scanned with OKEN Scanner

# फिर्याद

दि. ०७/१२/२०२३

श्री. प्रदिप दत्तात्रय देवकर, वय –३९ वर्षे, नोकरी – पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० रा.ठी. रु.नं.२०४, २ रा माळा, टी ५ इमारत, कोळे कल्याण पोलीस अधिकारी वसाहत, कलिना, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०९८ मो.क्र. ९५९४९७९७३४.

—ooo—

मी वरील प्रमाणे असून दि. २२/११/२०१९ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे पोलीस निरीक्षक (एक टप्पा पदोन्नती) पदावर नेमणूकीस आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ०७/२०१६ कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्र.प्र.का. १९८८ सह १०९ भादवि. प्रमाणे गै.अ.पुष्कर ताराचंद मेश्राम, दुय्यम अभियंता, म.न.पा. एच/पश्चिम विभाग, मुंबई. रा.ठि. २०२, तुळशी दर्शन सोसायटी, बी विंग, सेक्टर–११, कोपर खैराणे, नवी मुंबई यांचे विरुध्द लाचेची मागणी करून ती स्वीकारल्याने नमुद गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या सापळा कारवाई दरम्यान गैरअर्जदार पुष्कर मेश्राम हे वापरत असलेल्या व्हॅगनआर गाडीच्या झडती पंचनाम्यामध्ये रोख रक्कम रुपये ११,१५,०००/– मिळून आली होती, नमुद रक्कम गैरअर्जदार यांचे मालमत्तेत गणण्यात आली आहे. तसेच नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गैरअर्जदार पुष्कर मेश्राम यांच्या रहाते घरी श्रीमती सुषमा येवले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई यांनी घरझडती पंचनामा केला होता. सदर पंचनाम्यामध्ये नमुद आरोपी यांच्या उपरोक्त घराच्या घरझडती मध्ये रोख रक्कम रुपये २०,५०,०००/–, सोन्याचे ४६० ग्रॅम वजनाचे दागिने, महिला व पुरुष यांचे घडयाळे, पेन, इंटेरीयर डेकोरेशन, फर्निचर व इतर वस्तु असे एकुण मालमत्ता कि. रु. १,१०,१२,४८५/– इतकी मालमत्ता मिळून आली होती <u>परंतु</u> गैरअर्जदार यांनी नमुद मालमत्तेबाबत उघड चौकशीदरम्यान केलेले खुलाशे व सादर केलेल्या कागदपत्रांवरून घरझडती पंचनाम्यादरम्यान मिळालेल्या मालमत्तेची किंमत कमी आली असून गै.अ. पुष्कर मेश्राम यांचे मालमत्तेत रू.२५,७०,१३४/– व पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांचे मालमत्तेत रू.२,७४,११४/– अशी एकूण रू. २८,४४,२४८/– इतकी मालमत्ता ग्राहय धरण्यात आली आहे, तरी गैरअर्जदार यांच्या राहते घराच्या घरझडती पंचनाम्यादरम्यान मिळून आलेली मालमत्तेची किंमत त्यांनी सादर केलेली पुराव्याची कागदपत्रे व खुलासा यावरून रु. १,१०,१२,४८५/– ऐवजी रू. २८,४४,२४८/– इतकी ग्राहय धरण्यात आली आहे. त्याचप्रमाणे इंटेरियर डेकोरेशनकरीता खर्च करण्यात आलेली रक्कम रू.५,००,०००/– ही स्वतंत्रपणे खर्चात गणण्यात आली आहे.

गैरअर्जदार यांच्याकडे सापळा कारवाईदरम्यान अंगझडती व घरझडती पंचनाम्यादरम्यान मिळून आलेल्या मालमत्तेच्या अनुषंगाने त्यांचे संपादित मालमत्तेबाबत उघड चौकशी करण्याबाबत आदेशीत केले आहे. नमुद प्रकरणात यापूर्वी सपोआ अहिरे व सपोआ डोके यांनी चौकशी करुन अंतिम अहवाल सादर केला होते. चौकशी अधिकारी सपोआ डोके यांची लाप्रवि, मुख्यालय येथे बदली झाल्याने नमुद प्रकरण आम्हांस वर्ग करण्यात आले आहे, नमुद अहवालाच्या अनुषंगाने त्रुटी पूर्तता करून अंतिम अहवाल सादर करण्यात आला.

समक्ष,

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

**गै.अ. लोकसेवक पुष्कर ताराचंद मेश्राम यांची कौटुंबिक माहिती खालीलप्रमाणे:–**

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांचा जन्म नागपूर या ठिकाणी झाला असून त्यांचे पहिली ते १० वी पर्यंत शिक्षण नागपूर येथे झाले. बी. ई. नागपूर युनिर्व्हसिटी, एम टेक व्हीएनआयटी नागपूर, पी.जी.डी.बी.एम नागपूर युनिर्व्हसिटी मधुन पुर्ण केले आहे.

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांचा विवाह सौ. भाग्यश्री पुष्कर मेश्राम यांच्याशी झाला आहे त्या सन २००८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर कार्यरत आहेत.

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांचे वडील श्री. ताराचंद साधू मेश्राम, वय ६८ वर्षे हे डॉ. आंबेडकर हायस्कुल, हनुमान नगर, नागपुर या ठिकाणी १९६८ साली सहाय्यक शिक्षक म्हणुन रुजु झाले. सन १९८५ पासुन मुख्याध्यापक म्हणुन सदर शाळेचा कार्यभार सांभाळला होते. त्यांना रुपये ५०,०००/– इतके मासिक वेतन होते. सध्या ते सेवानिवृत्त झाले असुन त्यांना शासनाकडून दरमहा रुपये २३,०००/– इतकी पेन्शन दिली जाते.

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांची आई सौ. रत्नमाला ताराचंद मेश्राम, वय ६० वर्षे, धंदा–नोकरी, निकुंज विद्यालय, बिनाकी मंगळवारी, नागपूर येथे जुलै १९८४ पासून वरिष्ठ लिपीक हया पदावर काम करीत आहेत. त्यांना दरमहा रुपये ४८,४६०/– इतके मासिक वेतन होते. सध्या त्या सेवानिवृत्त आहेत.

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांचे भाऊ श्री. सुशिल ताराचंद मेश्राम, वय ३२ वर्षे, धंदा–नोकरी हा २०१४ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर कार्यरत आहेत त्याचा विवाह सौ. प्रियंका सुशिल मेश्राम यांच्याशी झाला आहे त्या सन २०१३ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर कार्यरत आहेत.

**परिक्षण सेवाकालावधीतील नोकरीची माहिती:–**

गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम यांची दि. १५/१०/२००७ पासून कनिष्ठ अभियंता या पदावर मनपा मध्ये नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांची नेमणुक एम पुर्व विभाग, गोवंडी, मुंबई येथील इमारत व कारखाने या ठिकाणी झाली. त्यानंतर २०१० मध्ये त्यांची बदली एच/पश्चिम विभाग, बांद्रा, मुंबई या ठिकाणी झाली. सन २०१५ मध्ये त्यांना दुय्यम अभियंता म्हणुन बढती मिळाली. त्यानंतर ते दुय्यम अभियंता म्हणुन सदर विभागातील इमारत व कारखाने या ठिकाणी कार्यरत होते.

गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम हे दि. १५/१०/२००७ साली बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कनिष्ठ अभियंता म्हणुन नोकरीस रुजू झाले. त्यांच्यावर सापळा कारवाई करण्यात आली त्यावेळी ते एच/पश्चिम, वॉर्ड

समक्ष,

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

बांद्रा विभाग, मुंबई या ठिकाणी दुय्यम अभियंता या पदावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांचा परिक्षण कालावधी हा दिनांक १५/१०/२००७ ते दिनांक ०५/०२/२०१६ असा गृहित धरण्यात आलेला आहे

सदर चौकशीच्या अनुषंगाने गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम व त्यांची पत्नी सौ. भाग्यश्री पुष्कर मेश्राम यांना परिक्षण कालावधीमध्ये शासकीय सेवेत देण्यात आलेले वेतन व त्यांना इतर कायदेशीर मार्गाने मिळालेले उत्पन्न, मालमत्ता व खर्च याबाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे –

**गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम यांचे स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील :–**

(अ)– परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता :– रु.००/–

(ब)– परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता :– रु. ७०,११,८९७/–

| अ.क्र. | (अ)– परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता | रूपये |
|---|---|---|
| १ | ——— | ००/– |

| अ.क्र. | (ब)– परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता | किंमत रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. २०२, बी विंग, तुलशी दर्शन, कोपरखैराणे, नवी मुंबई | २९,२४,६७४/– |
| २ | सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांच्या मोटार कारमध्ये मिळून आलेले मोबाईल व टॅब | ७८,५५०/– |
| ३ | अंगझडतीमध्ये मिळून आलेले मोबाईल फोन | ४६,५००/– |
| ४ | सापळा पंचनाम्या दरम्यान मिळून आलेल्या गाडीतील रोख रक्कम | ११,१५,०००/– |
| ५ | एलआयसी विमा पॉलीसीमधील गुंतवणूक | १,९०,७४९/– |
| ६ | परिक्षण कालावधी अखेर बॅकेतील शिल्लक | ३५,३६४/– |
| ७ | कोटक महिंद्रा विमा कंपनीत गुंतवलेली रक्कम | ५०,९२६/– |
| ८ | घरझडती पंचनाम्यामध्ये मिळून आलेली रोख रक्कम व मालमत्तांचे मुल्य | २५,७०,१३४/– |
| | स्थावर व जंगम मालमत्तेची एकूण किंमत | ७०,११,८९७/– |

**गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम यांचे उत्पन्नाचा तपशिल:–** रू. ६३,४६,५३५/–

| अ.क्र. | (क) उत्पन्नाचा तपशिल | रूपये |
|---|---|---|
| १ | निव्वळ वेतन | २५,४८,६१८/– |
| .२ | मिळालेला बोनस, ६ वा वेतन आयोगाचा फरक व व्याज | १,५९,१४८/– |
| ३ | कोपरखैराणे,नवी मुंबई. येथील फ्लॅटसाठी ॲक्सीस बॅकेकडून घेतलेले गृहकर्ज | १६,७५,९७१/– |

समक्ष,

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ४ | नातेवाईक, मित्र व आईकडून फ्लॅटसाठी घेतलेली रक्कम | १२,४८,७०३/– |
| ५ | आंध्रा बॅंकेकडून मिळालेले व्याज | १४,०९५/– |
| ६ | आई सौ. रत्नमाला मेश्राम यांनी दिलेली रक्कम | ७,००,०००/– |
| | एकूण रक्कम रुपये | ६३,४६,५३५/– |

गैरअर्जदार पुष्कर मेश्राम व त्यांची आई सौ. रत्नमाला मेश्राम हे त्यांचा दुसरा मुलगा सुशिल याचेकरीता घर खरेदी करणे आवश्यक असल्याने ते पैशाची जमवा–जमव करीत होते. त्याकरीता त्यांनी त्यांच्या आईच्या नावे असलेला फ्लॅट नं. १, तळमजला, बिल्डींग नं. ४७, फाम सोसायटी, प्लॉट नं. १९/१९–ए, सेक्टर–११, कोपरखैराने, नवी मुंबई हा फ्लॅट मॅट्रीक्स डायमंडस् प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर श्री. राजेश जैन यांना रु. ६५,००,०००/– एवढया किंमतीस विकण्याचे ठरविले. त्यापैकी त्यांनी टोकन रक्कम म्हणुन रु. २५,००,०००/– दि. २२/०१/२०१६ रोजी त्यांना श्री. राजेश जैन यांनी रोखीने दिले होते. सदरची रक्कम फ्लॅट खरेदी करण्यासाठी आई सौ. रत्नमाला मेश्राम यांनी गैरअर्जदार पुष्कर मेश्राम यांच्याकडे दिली होती. असे गैरअर्जदार पुष्कर मेश्राम याचे म्हणणे आहे.

गै.अ.यांचे घरझडती पंचनाम्यावेळी त्यांचे राहते घरी मिळून आलेली रोख रक्कम रु. २०,५०,०००/– ही नमुद व्यवहारातील आहे असा गैरअर्जदार पुष्कर मेश्राम याचा दावा आहे, परंतू १) सौ. रत्नमाला मेश्राम यांचे नावे असलेला फ्लॅट नं. १, तळमजला, बिल्डींग नं. ४७, फाम सोसायटी, प्लॉट नं. १९/१९–ए, सेक्टर–११, कोपरखैराने, नवी मुंबई हा फ्लॅट मॅट्रीक्स डायमंडस् प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर श्री. राजेश जैन यांना रु. ६५,००,०००/– एवढया किंमतीस विकण्याचे ठरविले होते, परंतू त्यानंतर नमुद सदनिकेची विक्री झालेली नाही.
२) गैरअर्जदार यांनी सादर केलेली एमओयू ही रू. १००/– स्टॅम्पवर केलेली असून नमुद एमओयूची मूळ प्रत चौकशीकामी सादर केलेली नसल्याने त्याचा अस्सलपणा/खरेपणा पडताळून पाहता आलेला नाही.
३) नमुद व्यवहारातील दोन्ही पक्षकार हे मुंबई राहत असून देखील स्टॅम्प पेपर नागपूर येथून खरेदी केला आहे हे अनाकलनीय आहे, त्याचप्रमाणे स्टॅम्प व्हेंडरचा तपशील गैरअर्जदार यांनी सादर केलेला नसल्याने याबाबत अधिक चौकशी करणे व जबाब नोंदविणे शक्य झालेले नाही.

४) श्री. प्रशांत प्रताप सुर्वे यांनी नमुदचा एमओयूची नमुद नोटरी केलेला असून तो नोंदणीकृत केलेला नसल्याचे जबाबात नमुद केले असून सदरचा दस्त हा एजंटने तयार करून आणला व त्यावर त्यांचे समक्ष दोन्ही पक्षकारांनी स्वाक्षरी केली असे नमुद करून त्याची कोणत्याही रजिस्टर नोंद केली नसल्याचे दिसून येत आहे.

५) गैरअर्जदार यांनी नमुद केलेप्रमाणे नमुद सदनिकेची रु. ६५,००,०००/– एवढया किंमतीस विक्री करण्याचे ठरले होते, नमुद रक्कमेच्या ४० टक्के रक्कम म्हणजेच रू. २५,००,०००/– इतकी रक्कम आगाऊ (Advance) दिलेले असल्याने हे तार्कीकदृष्टया योग्य व संयुक्तिक वाटत नाही.

समक्ष,

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रातिबंधक विभाग,मुंबई

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

६) एमओयुच्या आधारे रु. २५,००,०००/– मॅट्रीक्स डायमंडस् प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर श्री. राजेश जैन यांनी रोखीने दिलेले असल्याने हा व्यवहार काहीसा संशयास्पद वाटत असून नमुद व्यवहाराबाबत गैरअर्जदार यांनी आयकर विभागास कळविलेले नाही.

उपरोक्त नमुद कारणास्तव गैरअर्जदार यांना फ्लॅट विक्रीसंदर्भातील एमओयु आधारे मिळालेली टोकन रक्कम रु. २५,००,०००/– उत्पन्नातून नाकारण्यात आली आहे.

**गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम यांचे खर्चाचा तपशिल –**

रू. २०,१६,८९२/–

| अ.क्र. | ( ड ) खर्चाचा तपशिल | रूपये |
|---|---|---|
| १ | ना शाबित खर्च | |
| २ | ॲक्सीस बॅंकेकडून घेतलेल्या गृहकर्जाची परतफेड | ९,६३,७४९/– |
| ३ | मॅक्स लाईफ इन्शुरन्स करीता भरलेली रक्कम | ४,४०,८८८/– |
| ४ | फ्लॅट नं. २०२, बी विंग, तुलशी दर्शन या घरातील इंटेरिअर डेकोरेशन करीता केलेला खर्च | २५,९७१/–<br>५,००,०००/– |
| ५ | फ्लॅट नं. २०२, बी विंग, तुलशी दर्शनचा मेंटेनन्स | ४९,२२३/– |
| ६ | चालक हरुण ताई याचे गाडी भाडे | १२,०००/– |
| ७ | मोबाईल बिल | ८,५००/– |
| ८ | बॅंक खात्यातून झालेला इतर खर्च | ६,५६१/– |
| | **एकुण खर्च रूपये** | २०,१६,८९२/– |

गै.अ. पुष्कर मेश्राम यांच्या पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम या सन २००८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर कार्यरत आहेत. सौ. भाग्यश्री मेश्राम यांनी देखील त्यांचे नावे मालमत्ता संपादित केली असल्याने व त्यांचा उत्पन्नाचा स्वतंत्र स्त्रोत असल्याने त्यांना परिक्षण कालावधीमध्ये शासकीय सेवेत देण्यात आलेले वेतन व त्यांना इतर कायदेशीर मार्गाने मिळालेले उत्पन्न, मालमत्ता व खर्च यांची स्वतंत्र गणना करण्यात आली असून त्याबाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे –

**गै.अ. पुष्कर मेश्राम यांची पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांचा स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील :–**

(अ)– परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता :– रु.००/–

**(ब)– परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता :–** रु. २८,१९,२५०/–

| अ.क्र. | (अ)– परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता | रूपये |
|---|---|---|
| १ | ––––– | ००/– |

समक्ष,

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | (ब)– परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता | किंमत रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं. २०२, बी विंग, तुलशी दर्शन, कोपरखैराणे, नवी मुंबई | ५,७५,३२६/– |
| २ | एलआयसी मध्ये गुंतवलेली रक्कम | ३,३४,७२८/– |
| ३ | स्कोडा मोटार कार क्रं. एमएच–४३ एएल–१७९५ | ५,२७,७३२/– |
| ४ | मॅक्स लाईफ इन्शुरन्समध्ये गुंतवलेली रक्कम | २,२७,४०२/– |
| ५ | एक्साईड लाईफ इन्शुरन्समध्ये गुंतवलेली रक्कम | २५,२३७/– |
| ६ | परिक्षण कालावधी अखेर कार्पोरेशन बॅंकेमधील शिल्लक रक्कम | ८,५४,७११/– |
| ७ | घरझडती पंचनाम्यामध्ये मध्ये मिळून आलेल्या घरातील टि.व्ही. ए.सी. फ्रिज, इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु, इंटेरियल डेकोरेशन, साडया, ड्रेस, रोख रक्कम व सोन्याचे दागिने व पॉलिसीची रक्कम व इतर वस्तु. | २,७४,११४/– |
| | स्थावर व जंगम मालमत्तेची एकूण किंमत | २८,१९,२५०/– |

गै.अ. पुष्कर मेश्राम यांची पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांचे उत्पन्नाचा तपशिल:– रू. ३१,५५,९७७/–

| अ.क्र. | (क) उत्पन्नाचा तपशिल | रूपये |
|---|---|---|
| १ | निव्वळ वेतन | २७,२९,६९३/– |
| २ | बोनस व ६ व्या वेतन आयोगाचा मिळालेला फरक | १,२१,८८५/– |
| ३ | कार्पोरेशन बॅंक, चेंबुर या बॅंकेत जमा झालेल्या व्याजाची रक्कम | ५४,३९९/– |
| ४ | मोटार कार क्रं. एमएच–४३ एएल–१७९५ साठी घेतलेले कर्ज | २,५०,०००/– |
| | एकूण रक्कम रुपये | रु. ३१,५५,९७७/– |

गै.अ. पुष्कर मेश्राम यांची पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांचे खर्चाचा तपशिल – रू. ८,१८,६६१/–

| अ.क्र. | ( ड ) खर्चाचा तपशिल | रूपये |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.२०२, बी विंग, तुलशी दर्शन, कोपरखैराणे खरेदीवेळी भरलेले मुद्रांक व नोंदणी शुल्क | २,४९,०४०/– |
| २ | मोटार कार क्र. एमएच.४३.एएल.१७९५ च्या कर्जाची परतफेड | २,८३,२१०/– |
| ३ | मोटार कार क्र. एमएच.४३.एएल.१७९५ चा देखभाल व इंधन खर्च | १,८५,२९०/– |
| ४ | मोबाईल खर्च | ६४,४००/– |
| ५ | बॅंकेतून झालेला इतर खर्च | ३६,७२१/– |
| | एकुण खर्च रूपये | ८,१८,६६१/– |

समक्ष,

(सुरज बनसोडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

**गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम, दुय्यम अभियंता, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई व त्यांची पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांच्या अपसंपदेची एकत्रित गणना पुढीलप्रमाणे –**

| अ.क्र | तपशिल | गै.अ. पुष्कर मेश्राम | श्रीमती भाग्यश्री मेश्राम | एकत्रित |
|---|---|---|---|---|
| १ | दि. ०५/०२/२०१६ पर्यंत असलेली मालमत्ता (विधान– ब) | ७०,११,८९७/– | २८,१९,२५०/– | ९८,३१,१४७/– |
| २ | दि.१५/१०/२००७ पूर्वी असलेली मालमत्ता ( विधान– अ ) | ० | ० | ० |
| ३ | परिक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता ( ब – अ) | ७०,११,८९७/– | २८,१९,२५०/– | ९८,३१,१४७/– |
| ४ | परिक्षण कालावधीतील एकूण खर्च ( विधान– ड ) | २०,१६,८९२/– | ८,१८,६६१/– | २८,३५,५५३/– |
| ५ | परिक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता व खर्च ( ३ + ४ ) | ९०,२८,७८९/– | ३६,३७,९११/– | १,२६,६६,७००/– |
| ६ | परिक्षण कालावधीतील एकूण उत्पन्न ( विधान– क ) | ६३,४६,५३५/– | ३१,५५,९७७/– | ९५,०२,५१२/– |
| ७ | अपसंपदा ( ५ – ६ ) = डी.ए. | २६,८२,२५४/– | ४,८१,९३४/– | ३१,६४,१८८/– |
| अपसंपदेची टक्केवारी = शिल्लक रक्कम X १०० / एकूण उत्पन्न | | **४२.२६ टक्के** | **१५.२७ टक्के** | **३३.२९ टक्के** |

गै.अ. यांची नमुद करण्यात आलेली 'फ्लॅट नं. २०२, बी विंग, तुलशी दर्शन, कोपरखैराणे, नवी मुंबई' ही मालमत्ता गैरअर्जदार लोकसेवक पुष्कर ताराचंद मेश्राम व त्यांची पत्नी श्रीमती भाग्यश्री मेश्राम यांनी एकत्रितपणे खरेदी केली आहे. लोकसेवक व त्यांची पत्नी हे एकत्रित राहावयास असल्याने स्थावर मालमत्तेची देखभाल, दुरूस्ती खर्च व नोंदणी खर्च याबाबत देखील लोकसेवक व त्यांची पत्नी यांचेमध्ये आर्थिक व्यवहार झालेले आहेत.

उपरोक्त अपसंपदेच्या एकत्रित तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे लोकसेवक पुष्कर ताराचंद मेश्राम यांनी त्यांचे परिक्षण कालावधीत स्वतःच्या नावे रू. २६,८२,२५४/– एवढी अपसंपदा संपादित केली आहे. तसेच त्यांची पत्नी श्रीमती भाग्यश्री पुष्कर मेश्राम यांनी स्वतःच्या नावे रू. ४,८१,९३४/– एवढी अपसंपदा संपादित केली आहे.

समक्ष,

(सुरज बनसोडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रातिबंधक विभाग,मुंबई

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with OKEN Scanner

एकंदरीत, सौ. भाग्यश्री मेश्राम यांनी बाळगलेली अपसंपदा रू. ४,८१,९३४/- ही लोकसेवक पुष्कर ताराचंद मेश्राम यांची भ्रष्ट मार्गाने मिळविलेली मिळकत (illgotten property) असल्याने ती लोकसेवक मेश्राम यांचे अपसंपदेमध्ये वाढ करण्यात येवून त्यांची अपसंपदा रू. २६,८२,२५४ + रू. ४,८१,९३४ = ३१,६४,१८८/- ग्राहय धरण्यात आली आहे. त्यामूळे लोकसेवक पुष्कर मेश्राम यांचे अपसंपदेची टक्केवारी खालीलप्रमाणे काढली आहे -

$$\text{अपसंपदेची टक्केवारी} = \frac{३१,६४,१८८}{९५,०२,५१२} \times १०० = ३३.२९ \text{ टक्के}$$

गै.अ. पुष्कर ताराचंद मेश्राम व त्यांची पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम हे सोबत राहून एकत्र आर्थिक व्यवहार करतात, त्यामूळे सौ. भाग्यश्री मेश्राम यांनी स्वत:च्या नावे धारण केलेली अपसंपदा ही लोकसेवक पुष्कर ताराचंद मेश्राम यांचीच आहे.

तरी, गैरअर्जदार पुष्कर ताराचंद मेश्राम, दुय्यम अभियंता, एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी दिनांक १५/१०/२००७ ते दि. ०५/०२/२०१६ या शासकिय सेवा कालावधीत स्वत:साठी ज्ञात उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत तसेच समाधानकारक हिशेब देऊ शकत नाही, अशी रु. ३१,६४,१८८/- इतकी मालमत्ता कब्जात ठेवून उद्देशपूर्वकपणे स्वत:ला अनुचितपणे समृध्द केले असल्याचे निष्पन्न झाल्याने व सदरची मालमत्ता भ्रष्ट मार्गाने संपादित केली असल्याचे माहिती असूनही त्यांची पत्नी श्रीमती भाग्यश्री मेश्राम सदरची अपसंपदा स्वत:च्या नावे बाळगून गैरअर्जदार यांना सहाय्य केले आहे म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ई) सह १३ (२) सह भादंवि कलम १०९ अन्वये माझी सरकारतर्फे नमुद दोघांविरुध्द तक्रार आहे.

माझी फिर्याद वाचून पाहिली असता माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(सुरज बनसोडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रातिबंधक विभाग,मुंबई

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

सोबत : उघड चौकशी क्र. १५/२०१६ चा अंतिम अहवाल.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ – चौकशीअंती

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............

Unnatural / Accidental Death Case No., if any

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक पुष्कर तारचंद मेश्राम यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य पार पाडत
असताना दि. 15/10/2007 ते दि. 08/02/2016 कालावधीमध्ये भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर
आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची रु. 26,82,254/- स्वतःचे अपसंपदा संपादित केली
तसेच पत्नी सौ. भाग्यश्री मेश्राम यांनी सदर रु. 4,81,934/- एवढी अपसंपदा स्वतःच्या
नावे बाळगून लोकसेवक पुष्कर मेश्राम यांना भ्रष्ट व बेकायदेशीर अपसंपदा
मिळविण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणून लोकसेवक पुष्कर मेश्राम व पत्नी भाग्यश्री मेश्राम
यांचे विरुद्ध भ्र.प्र. अधि. 1988 चे कलम 13(1)(ई) सह 13(2) सह भादवि कलम 109 प्रमाणे गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ——

............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... — ......, जिल्हा ...... — ......, राज्य ...... —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............... Rank............... No...............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............................................. (3) Transferred to P. S. ..............................
District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... सुरज बनसोडे ......
पदनाम Rank... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ... लाप्रवि, मुंबई विभाग
Posting
Code No. of I. O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner